**शिक्षणाधिकारी कार्यालय**
**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर**
**सिव्हील लाईन, २१०, पहिला माळा, जि. प. जूनी इमारत, नागपूर-०१**
**फोन/फॅक्स: ०७१२-२५४९१४९** **ई मेल: mdmnagpur१५@gmail.com**

जा. क्र. जिपना/शिक्षण/प्राथ. /पवित्र भरती/ ८७६३ /२०२६ दिनांक:- २५/०९/२०२६

**प्रति,**
निवड यादीतील अनुक्रमांक १ ते १०३
मधिल उमेदवार (ई- मेल द्वारे)

**विषय :- पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक पदभरती २०२५ टप्पा - १ रुपांतरीत फेरी प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करून उपस्थित राहण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. पवित्र पोर्टलवरील शिक्षक पदभरती प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली निवड यादी प्राप्त दि.२१.०९.२०२६
२. मा. शिक्षण आयुक्त,आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.मरापप/प.पो./पदभरती/टप्पा१,रुपांतरीत फेरी/२०२६ दिनांक २१.०९.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात आलेल्या शिक्षक पदभरती २०२५ टप्पा -१ रुपांतरीत फेरी प्रक्रियेत आपली जिल्हा परिषद नागपूर येथे शिक्षण सेवक पदावर निवड झालेली आहे. सदर निवड प्रक्रियेअंतर्गत आपल्या शैक्षणिक, व्यावसायिक, जात, जातवैधता, अधिवास तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | प्रसिद्ध करण्यात आलेली निवड यादीतील अनुक्रमांक | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अनु. क्र. १ ते १०३ पर्यंत | मंगळवार<br>दि. २९/०९/२०२६ | सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत | जिल्हा परिषद माजी शासकीय माध्यमिक शाळा सदर ,छावणी, काटोल रोड, नागपूर |

पडताळणीसाठी सहपत्रात नमूद केलेल्या यादीप्रमाणे अनुक्रमांकानुसार आवश्यक कागदपत्रांचे दोन संच तयार करून, सदर कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणी कागदपत्र पडताळणीसाठी वेळेवर उपस्थित राहावे.

**सहपत्र :-** १. तपासणी सुची
२. निवड यादी

Digitally signed by
VINAYAK PRAKASHRAO MAHAMUNI
Date: 25-09-2026 16:35:42

**विनायक महामुनी (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नागपूर**

**शिक्षणाधिकारी कार्यालय**
**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर**
**सिव्हील लाईन, २१०, पहिला माळा, जि. प. जूनी इमारत, नागपूर-०१**
**फोन/फॅक्स: ०७१२-२५४९१४९** **ई मेल: mdmnagpur१५@gmail.com**

**जा. क्र. जिपना/शिक्षण/**प्राथ. **/पवित्र भरती/**८७६४**/२०२६** **दिनांक:-** २५**/०९/२०२६**

**वाचा:** -१) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दि. - ०७ फेब्रवारी, २०१९ मधील परिच्छेद क्र. १०
२) मा. शिक्षण आयुक्त,आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.मरापप/प.पो./पदभरती/टप्पा१,रुपांतरीत फेरी/२०२६ दिनांक २१.०९.२०२६

# पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती -२०२५

**आदेश -**

जिल्हा परिषद, नागपूर व्दारा शिक्षक पदभरती करीता पवित्र पोर्टलवर दिलेल्या ४१८ पदांचे जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ यामध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र पोर्टलवर टप्पा -१ रुपांतरीत फेरीत एकुण १०३ उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ मुलाखतीशिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या संस्थामध्ये "पवित्र प्रणाली" अंतर्गत शिक्षक पदभरती निवड टप्पा -१ रुपांतरीत फेरी यादीतील उपलब्ध एकुण १०३ उमेदवारांच्या कागपपत्राची पडताळणी व पुढील आवश्यक कार्यवाही मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे संदर्भिय पत्र क्र.२ नुसार नमुद निर्देशाप्रमाणे करावयाची आहे.

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ मधील परिच्छेद क्र. १०. अन्वये शिक्षण सेवक पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीपूर्वी त्याच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रमाणपत्राची पडताळणी खालील समितीमार्फत करण्यात येईल. असे नमुद आहे.

**जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी खालीलप्रमाण समिती आहे.**

1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
2. समाज कल्याण अधिकारी
3. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद, नागपूर करीता शिक्षण सेवक पदी एकुण १०३ उमेदवारांची निवड झालेली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, नागपूर करीता विकल्प दिलेल्या पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध गुणवत्ता यादीतील उमेदवारांचे संबंधितांनी पवित्र पोर्टलवर स्वप्रमाणपत्रामध्ये नमुद केलेली माहीती व त्या अनुषंगाने अपलोड केलेली कागदपत्रानुसार मुळ कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी **जिल्हा परिषद माजी शासकीय माध्यमिक शाळा सदर छावणी, सिविल लाईन, काटोल रोड, नागपूर** येथे खालील प्रमाणे दिलेल्या तारखेस व दिनांकास करावयाची आहे.

| अ.क्र. | पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध यादीतील उमेदवाराचा अ.क्र. | मुळ कागदपत्रे तडताळणी करीता उपस्थित राहावयाचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | अनु. क्रमांक १ ते १०३ | दिनांक २९/०९/२०२६ | सकाळी १०.३० पासून |

सदर गुणवत्ता यादीतील अनुक्रमांकानुसार उक्त दिनांकास व वेळी नियोजित स्थळी उपस्थित राहण्याबाबत सर्व उमेदवारांना सुचना देण्यात आलेल्या आहे.

उपरोक्त नियोजनाप्रमाणे मुळ दस्ताऐवज पडताळणी करीता उपस्थित झालेल्या उमेदवारांच्या मुळ दस्ताऐवज पडताळणी करण्याकरीता खालील अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत असुन, कागदपत्रे पडताळणी करिता खालील प्रमाणे पथक करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पथक प्रमुखाचे नाव | सहाय्यक अधिका-याचे नाव | कागदपत्रे पडताळणी करिता सोपविण्यात आलेल्या उमेदवाराचा अनु. क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | दि. २९/०९/२०२६ |
| १ | श्री. विशाल गौर,<br>अधिक्षक, शापोआ<br>पं.स.काटोल | १. श्री. उमेशसिंग कच्छवाह<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. श्री.नरेद्र मेश्राम, स.प्र.अ. ग्रा. पा. पु. जि. प. नागपूर | **०१ ते १७** |
| २ | श्री.अनुराग ब्रम्हपुरीकर<br>अधिक्षक, शापोआ<br>पं.स.उमरेड | १. श्री. प्रकाश लेदे<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. संतोष जगताप, स.प्र.अ. कृ.वि. जि. प. नागपूर | **१८ ते ३४** |
| ३ | श्रीमती नयना दळवी<br>अधिक्षक, शापोआ<br>शिविप्रा जि.प.नागपूर | १. श्री. भास्कर झोडे,<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. राजू चौधरी,स.प्र.अ.म.बा.क.वि. जि.प. नागपूर | **३५ ते ५१** |
| ४ | श्रीमती बिंदु भैसारे<br>अधिक्षक, शापोआ<br>पं.स.कामठी | १. श्रीमती सुजाता आगरकर,<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. हेमलता गोटे, स.प्र.अ. शिक्षण विभाग जि.प.नागपूर | **५२ ते ६८** |
| ५ | श्रीमती जयश्री शिंदे<br>अधिक्षक, शापोआ<br>पं.स.सावनेर | १. श्री. सुशिल बन्सोड,<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. प्रविण भापकर, स.प्र.अ., पं. स. भिवापूर | **६९ ते ८५** |
| ६ | श्रीमती ऋुता शिवरकर<br>अधिक्षक, शापोआ<br>पं.स.भिवापुर | १. श्री.रमेश हरडे,<br>शिक्षण विस्तार अधिकारी<br>२. गिरीश चांगले, क.प्र.अ. पं. स. नागपूर | **८६ ते १०३** |

**तसेच तपासणी करण्याकरिता खालील कर्मचा-याची राखिव म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.**

१. श्री. श्रीमती शारदा किनारकर, शिक्षण विस्तार अधिकारी, शिविप्रा जि.प.नागपूर
२. श्री. प्रशांत पाटिल, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती सावनेर
३. श्री. ज्ञानेश्वर खिची, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती नागपूर

तसेच वरिल पथकाद्वारे तपासणी केलेल्या तपासणी सुचीवर तपासणी प्रमुख व दोनही सदस्यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करणे व सर्व स्व-प्रमाणित छायाकित प्रत अनुक्रमानिहाय लावले असल्याची शहानिषा करण्यासाठी तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, समाज कल्याण अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या समिती समक्ष विहित प्रपत्रात माहिती सादर करण्याकरिता खालील प्रमाणे पथकाची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.चंद्रमणी मनवर | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| २. | श्री. प्रकाशसिंग राठोड | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| ३. | श्री. पंकज घोडमारे | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| ४. | श्री. विकास तवले | वरिष्ठ सहाय्यक |
| ५. | श्री. सचिन काळबांडे | कनिष्ठ सहाय्यक |

रिक्त पदांची माहिती तयार करणे, समुपदेशन प्रक्रिया व नियुक्ती आदेश तयार करण्याकरीता खालील अधिकारी व कर्मचा-याची नियुक्ती करण्यात येत आहे.

| आ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. निखिल भुयार | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) |
| २. | श्री. संजय तांबडे | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| ३. | श्री. अरुण काळे | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| ४. | श्री. अनिकेत बटुळे | वरिष्ठ सहाय्यक |

वरिल कार्यवाहीच्या अनुषंगाने उक्त प्रक्रियेचे सनियंत्रणाकरिता खालील अधिका-याची नियुक्ती करण्यात येत आहे.

१. श्रीमती अंशुजा गराटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि, जि. प. नागपूर
२. श्री. निलेश गुंड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नागपूर

Digitally signed by
VINAYAK PRAKASHRAO MAHAMUNI
Date: 25-09-2026 16:35:10

**विनायक महामुनी (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नागपूर**

**प्रतिलिपी -**

**१.** मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे-1 यांना माहितीस सविनय सादर.
२. श्री/श्रीमती------------------------------------यांना माहीतीस तथा वरील प्रमाणे उचित कार्यवाहीस अग्रेषित.